



सत्यमेव जयते



Govt.Of Maharashtra
School Education Deptt.
State Institute of Science Education
(Regional Academic Autherity)
Ravi Nagar,Nagpur 440001
Mail Id:directorsise@gmail.com

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
राज्य विज्ञान शिक्षण संस्था
(प्रादेशिक विद्या प्राधिकरण)
रवि नगर नागपूर ४४०००१
मेल: directorsise@gmail.com

जावक क्रमांक :रा वि शि सं/नाग/५४वे राबावैप्र (RSBVP)/2026/ दिनांक : /09/2026

अत्यंत महत्वाचे,

प्रति,

1. शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक,योजना) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
2. शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई,पश्चिम,उत्तर,दक्षिण,मुंबई.

विषय :- ५४ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी (RSBVP)-2026-27 च्या अनुषंगाने तालुका व जिल्हास्तरीयबाल वैज्ञानिक प्रदर्शनी आयोजित करणेबाबत.

संदर्भ :- 1. **मा. डॉ. सुनीता फरक्या प्राध्यापक तथा विभाग प्रमुख व मा. डॉ.निरोज कुमार साहू प्राध्यापक तथा समन्वयक राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी (RSBVP)-2026-27 एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली, भारत सरकार यांचे पत्र क्र. F—No .12 -4 /DESM /ACM /2026-27** दिनांक 28.08.2026

2. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-**2024/प्र.क्र.146 (ई-1180516)/एसडी-1**दिनांक** 06 मे, 2026.**(मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी)**

3. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-**2024/प्र.क्र.146 /एसडी-1 **दिनांक** 24 मार्च,2026.**(राज्य स्तरतरिय बक्षीस रकमेत वाढ)**

४. **एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली, भारत सरकार याचे राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी (RSBVP)-2026-27 दिशानिर्देश चे बाबतीत दि ०७.०९.२०२६ ला मा. डॉ.निरोज कुमार साहू प्राध्यापक तथा समन्वयक राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी (RSBVP)-2026-27 एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली,भारत सरकार.यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाचे ५४ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी (RSBVP) **डिसेंबर** 2026 (अंदाजित कालावधी) या दरम्यान **5 दिवस** कालावधीचे आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

यावर्षी एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली च्या संदर्भीय दिशानिर्देशान्वये विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय **"शाश्वत आणि विकसित भारतासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष"**

(Science, Technology, and Innovation for a Sustainable and Viksit Bharat)

असा निश्चित केला आहे. सामाजिक ,पर्यावरणास अनुकूल आणि सध्याच्या काळाची गरज लक्षात घेवून मुख्य विषयाला अनुसरून पुढीलप्रमाणे एकूण सहा उपविषय निर्धारित केलेले आहेत.

उपविषय : (Sub —Themes)

1. **उत्तम जीवनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) (Artificial Intelligence for Better Life)**
2. **हरित ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धन (Green Energy &Environmental Conservation)**
3. **गणितीय प्रतिकृतीकरण आणि संगणकीय विचारसरणी (Mathematical Modelling and Computational Thinking)**
4. **आरोग्य, स्वच्छता आणि स्वच्छताविषयक सुविधा (Health, Hygiene and Sanitation)**
5. **देशी/स्थानिक कृषी पद्धती (Indigenous Agricultural Practices)**
6. **ग्रामीण परिवर्तनासाठी विज्ञान (Science for Rural Transformation)**
7. **आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management)**

उपरोक्त उप विषया पैकी कोणत्याही एका उपविषयावर आधारित उच्च प्राथमिकस्तर (इयत्ता 6 वी ते 8वी पर्यंत) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यत च्या (इयत्ता 9 वी ते 12 वी) शालेय विद्यार्थ्यांकडून प्रदर्शनीय वस्तू, प्रतिकृती, वैज्ञानिक प्रकल्प तयार करण्याचे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान आणि खेळण्यांमधील नवकल्पनांचा समावेश असलेली प्रदर्शनीय वस्तू विकसित करण्याचे स्वातंत्र्य आहे.

सहभाग : एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांच्या संदर्भीय दिशा निर्देशान्वाये या प्रदर्शनीत आपल्या जिल्हयातील सर्व मान्यता प्राप्त शाळेतील पुढील दोन गटातील विद्यार्थी

(i) **उच्च प्राथमिकस्तर :** (इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंतचे विद्यार्थी)

(ii) **माध्यमिक व उच्च माध्यमिकस्तर :** (इयत्ता 9 वी ते12 वी पर्यंतचे विद्यार्थी)

सहभागी होऊ शकतात.या विद्यार्थ्यांनी त्यांचे मार्गदर्शक शिक्षक आणि शाळेतील प्रयोगशाळा परिचर/सहाय्यक यांच्या मदतीने वरील उपविषयापैकी एका उपविषयावर आधारित प्रदर्शनीय वस्तू/ प्रतिकृती/ वैज्ञानिक प्रकल्प तयार करणे अभिप्रेत आहे.

(iii) जर दिव्यांग विद्यार्थी सहभागी झाल्यास त्यांच्यामधून एका विद्यार्थ्यांची निवड करून राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पाठविण्यात यावे.या दिव्यांगविद्यार्थ्याजवळ **सक्षम अधिकाऱ्यांचे अपंगत्वाबाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

NCERT यांचे उपरोक्त संदर्भीय दिशानिर्देशान्वये राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनाकरिता मूल्यमापनासाठी

1. उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता 6 वी ते 8 वी)
2. माध्यमिक व उच्च माध्यमिकस्तर (इयत्ता 9 वी ते 12 वी)

असे दोन गट निश्चित केलेले आहेत.

विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेणाऱ्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी यापूर्वीच्या विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेले वैज्ञानिक प्रकल्प/ प्रदर्शनीय वस्तूंचे पुन्हा यावर्षीच्या विज्ञान प्रदर्शनात सादरीकरण व पुनरावृत्ती होणार नाही, तसेच INSPIRE Award MANAK प्रदर्शनात सहभाग घेतलेले विज्ञान प्रकल्प/वैज्ञानिक प्रतिकृती तालुकास्तरीय /जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पुन्हा मांडले जाणार नाहीत, त्याचप्रमाणे बाजारातून रेडीमेड साहित्य विकत घेऊन विज्ञान प्रदर्शनात सादर करण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

व्याप्ती :- या विज्ञान प्रदर्शनात राज्यातील सर्व शासन मान्यता प्राप्त शाळा सहभागी होतील. शासन मान्यता प्राप्त शाळा म्हणजे (1) शासकीय (2) माजी शासकीय जिल्हा परिषद (3) महानगर पालिका/ नगर पालिका/कटक मंडळ/ नगर परिषदेच्या शाळा (4) खाजगी अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शासन मान्य शाळा (5) मिशनरी शाळा (6) आश्रम शाळा इत्यादी प्रकारच्या शाळा होय. प्रत्येक शाळेतून वरीलपैकी **एका गटात एका वैज्ञानिक प्रकल्पासह फक्त एकच विद्यार्थी सहभाग घेऊ शकेल.**

प्रदर्शन कालावधी :

1) राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनाच्या आयोजनाची पूर्व तयारी म्हणजे तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीयविज्ञान प्रदर्शन होय. आपल्या जिल्हयात पुढील कालावधीत प्रदर्शनाचे आयोजन करावे.

अ.क्र.	**विज्ञान प्रदर्शनाचा स्तर**	**कालावधी**
(1)	तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दिनांक:	07 सप्टेंबर 2026 ते 20 ऑक्टोबर 2026
(2)	जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन दिनांक :	21 ऑक्टोबर 2026 ते 21 नोव्हेंबर 2026
(3)	राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनदिनांक (संभाव्य कालावधी):	डिसेंबर 2026

2)राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य (माध्यमिक शिक्षकांचे)प्रदर्शन व स्पर्धा 2026-27:

दरवर्षी प्रमाणे सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात राज्यस्तरीय शैक्षणिक साहित्य (माध्यमिक शिक्षकांचे) प्रदर्शन व स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत फक्त माध्यमिक शिक्षक सहभागी होतील. माध्यमिक शिक्षक म्हणजे इयत्ता 9 वी ते 12 वी पर्यंत शिकविणारे शिक्षक. या स्पर्धेतून जिल्हास्तरावर एका उत्कृष्ट अशा माध्यमिक शिक्षकाच्या शैक्षणिक साहित्याची निवड करण्यात यावी. सर्व माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळांनाही शिक्षणाधीकारी यांनी याबाबत कळवावे.

3)राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य (प्राथमिक शिक्षकांचे) प्रदर्शन व स्पर्धा 2026-27:

सन 2006-07 या वर्षापासून राज्यस्तरावर प्राथमिक शिक्षकांनी तयार केलेल्या (गणित व विज्ञान) शैक्षणिक साहित्य प्रदर्शन व स्पर्धाचे आयोजन करण्यात येत आहे. या चालू वर्षात राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य (प्राथमिक शिक्षकांचे) प्रदर्शन व स्पर्धा 2026-27 आयोजित करण्यात येत आहे. **प्राथमिक शिक्षक म्हणजे इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंत शिकविणारे शिक्षक**. तरी जिल्हयातील सर्व शाळांना शिक्षणाधीकारी यांनी याबाबत प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी कळवावे. या स्पर्धेतून जिल्हास्तरावर एका उत्कृष्ट अशा प्राथमिक शिक्षकांच्या शैक्षणिक साहित्याची निवड कारण्यात यावी.

4)राज्यस्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक परिचर यांचे प्रायोगिक साधनांचे प्रदर्शन व स्पर्धा 2026-27 :

सन 2006-07 या वर्षापासून राज्यस्तरावर प्रयोगशाळा सहाय्यक परिचर यांनी तयार केलेल्या (गणित व विज्ञान) वैज्ञानिक उपकरण/ प्रतिकृतीचे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी राज्यस्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक / परिचर यांच्या प्रायोगिक साधनांचे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.जिल्हास्तरावर वरील प्रमाणे प्रदर्शन आयोजित करावे व सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील प्रयोगशाळा सहाय्यक परिचर यांना प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन शिक्षणाधीकारी यांनी याबाबत करावे.

निवड प्रक्रिया :

1) **विद्यार्थ्यांच्या प्रदर्शनीय वस्तू :-**

आदिवासी भाग असलेल्या जिल्हयांकरिता

1.1	उच्च प्राथमिक स्तरापर्यंतच्या गटातून (इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंत)	तीन (3)
	दिव्यांग गटातून	एक (01) व
	आदिवासी गटातून	एक (01)
		असे एकूण (05)
1.2	माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून (इयत्ता 9 वी ते 12 वी)	तीन (3)
	दिव्यांग	एक (01) व
	आदिवासी गटातून	एक (01)
		असे एकूण पाच (05)

असे दोन्ही गटातून एकूण दहा (10) प्रदर्शनीय वस्तू आणि

बिगर आदिवासी जिल्हयांकरिता

1.3	उच्च प्राथमिक स्तरापर्यंतच्या गटातून (इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंत)	तीन (3)
	दिव्यांग गटातून	एक (01) व
		असे एकूण (04)
1.4	माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून (इयत्ता 9 वी ते 12 वी)	तीन (3)
	दिव्यांग	एक (01) व
		असे एकूण पाच (04)

असे दोन्ही गटातून एकूण दहा (08) प्रदर्शनीय वस्तू

प्रदर्शनीय वस्तूंची मूल्यमापनाच्या निकषानुसार ५४ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी करीता निवड करावी.

2) **जिल्हास्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य (इयत्ता 9 वी ते 12 वी ला शिकविणारे माध्यमिक शिक्षक)प्रदर्शन** :या स्पर्धेमधून **एका उत्कृष्ट शैक्षणिक साहित्याची** राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य प्रदर्शन व स्पर्धेकरीता निवड करावी.

3) **राज्यस्तरावर अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य (इयत्ता 1 ते 8 ला शिकविणारे प्राथमिक शिक्षक) प्रदर्शन** : या स्पर्धेतून एका उत्कृष्ट शैक्षणिक साहित्याची राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्याची राज्यस्तरीय प्रदर्शन व स्पर्धेसाठी निवड करावी.

(4) **जिल्हास्तरावर प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर यांच्या वैज्ञानिक साहित्याचे प्रदर्शन व स्पर्धेमधून** प्रयोगशाळा सहाय्यक /परिचर यांच्या या स्पर्धेतून एका उत्कृष्ट शैक्षणिक साहित्याची राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्याची राज्यस्तरीय प्रदर्शन व स्पर्धेसाठी निवड करावी.

उपरोक्त 1 ते 4 मुद्यात नमुद केल्याप्रमाणे निवड यादी शिफारशीसह शिक्षणाधीकारी यांनी दिलेल्या विहित नमुन्यात दिलेल्या कालावधीतच या संस्थेस पाठवावी.

प्रदर्शनीय वस्तूंची मांडणी: प्रदर्शनीय वस्तूंच्या मांडणीकरीता प्रत्येक गटातील प्रदर्शनीय वस्तूसाठी साधारणपणे 122 cm x 76 cm x 274 cm एवढी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. विज्ञान प्रदर्शन शक्यतो शाळांच्या इमारती / सार्वजनिक इमारती/ज्या ठिकाणी योग्य सोय आहे अशा ठिकाणी भरविण्यात यावे.

आवश्यक सूचना :

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांनी जिल्हयातील सर्व शासन मान्यता प्राप्त उच्च प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना परिपत्रक त्वरीत पाठविण्याची कार्यवाही करावी. परिपत्रक शाळांना उशिरा मिळाल्यामुळे शिक्षकांना, विद्यार्थ्यांना विचार करण्यास फार थोडा वेळ मिळतो. त्याकरीता शाळांना लवकरात लवकर परिपत्रक पाठवावे जेणे करून दर्जेदार व नवनवीन प्रदर्शनीय वस्तू प्रकल्प तयार करण्यास पुरेसा वेळ मिळेल.

२. बाल वैज्ञानिक प्रदर्शनी बाबतची माहिती प्रसार माध्यमांमार्फत जनसामान्यापर्यंत पोहचवावी.

३. संदर्भ क्र.१अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ५४ वे बाल वैज्ञानिक प्रदर्शनी मध्ये तालुका स्तरावर प्रदर्शनात निवड विद्यार्थी, जिल्हा स्तरावर प्रदर्शनात निवड विद्यार्थी व राज्य स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थी यांना "मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी"अंतर्गत लाभ देण्यात येईल.याकरिता शिक्षणाधीकारी यांना सदर लाभ मिळण्याकरिता प्रचार आणि प्रसार करावा व जास्तीत-जास्त विद्यार्थी या प्रदर्शनीमध्ये सहभाग घेतील यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

४. **संदर्भ क्र.२ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ५४ वे बाल वैज्ञानिक प्रदर्शनी मध्ये विविध गटांमध्ये मिळणाऱ्या रोख पारितोषिकांच्या रकमेमध्ये भरघोष वाढ केल्यामुळे जास्तीत-जास्त विद्यार्थी या प्रदर्शनीमध्ये सहभाग घेतील यासाठी प्रयत्न करण्यात यावे.**

५. तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन तीन (3) दिवस कालावधीचे (नमूद कालावधीतील) आयोजित करावे.

६. जिल्हास्तरीय प्रदर्शन कालावधीत विज्ञान रंजन कार्यक्रमाचे,सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

७. प्रदर्शनाबाबतची माहिती प्रसार माध्यमाशिवाय चित्रपट गृह, व्हिडीओ गृह, रेडिओ, टी.व्ही व सिटी केबल द्वारे प्रसिद्धीला देण्यात यावी. प्रदर्शनाबाबतची माहिती ग्रामीण जनतेला, विद्यार्थ्यांना,शिक्षकांना होण्यासाठी शिक्षण परिषद,चर्चासत्रातून,समाज माध्यमांद्वारे देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन करावे. विज्ञान प्रदर्शन हे केवळ औपचारिकता राहणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

८. प्रदर्शन वस्तूंची निवड तज्ञांमार्फत करतांना **पुनरावृत्ती (Repetitions) होणार नाही** याची दक्षता घ्यावी. यासाठी मागील पाच वर्षांतील निवड झालेल्या तालुका व जिल्हास्तरावरील निवड याद्या तज्ज्ञांना पुरवाव्यात म्हणजे पुनरावृत्ती (Repetitions) टाळता येईल. **प्रदर्शनीय वस्तूंचे मूल्यमापन निकषानुसार वस्तुनिष्ठ व्हावे. याबाबत पालक व विद्यार्थांकडून कोणतीही तक्रार येणार नाही याची काळजी घ्यावी.**

९. सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाचे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी (RSBVP) 2026-27 आणि राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शन 2026-27 चे आयोजन होत आहे. त्या निमित्याने जनतेत जनजागृती करावी.

१०. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी आपल्या अधिनस्त शिक्षणाधीकारी (मनपा) यांना देखील याबाबत माहिती देवून तालुका/शहरातील झोन स्तरीय सहभागी होण्याबाबत कळवावे.

सांख्यिकीय माहिती :

अ. जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आटोपताच निर्धारित प्रपत्रात माहिती भरुन त्वरीत सादर करावी.

ब. तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन, शैक्षणिक साहित्य प्रदर्शन, प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शिक्षक यांचे शैक्षणिक साहित्य व प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर यांची वैज्ञानिक साधने याबाबत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची / शिक्षकांची / प्रयोगशाळा सहाय्यक / परिचर यांच्या उपस्थितीची माहिती तात्काळ या संस्थेकडे पाठवावी.

उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या मुद्यांकडे अधिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी. आपल्या सुलभ संदर्भाकरिता विज्ञान प्रदर्शनाच्या आयोजनासंबंधी नियमावली व मूल्यमापनाचे निकष यासोबत जोडलेले आहेत. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करून प्रदर्शन आटोपताच **३० नोव्हेंबर २०२६** पर्यंत अहवाल, सांख्यिकीय माहिती, इत्यादी सर्व माहिती विहित प्रपत्रात या संस्थेस न चूकता सादर करावी. अधिक माहितीसाठी NCERT ची वेबसाईट (www.ncert.nic.in) पहावी.अधिक माहिती करिता डॉ.हेमलता बांबल (9673144222) विभाग प्रमुख तथा जेष्ठ अधिव्याख्याता,प्रस्तुत कार्यालय यांचेशी संपर्क साधावा.

Digitally signed by
Rajkumar Pralhadrao Awasare
Date: 07-09-2026 16:00:15

(डॉ. राजकुमार अवसरे)
संचालक
राज्य विज्ञान शिक्षण संस्था
तथा
प्रादेशिक विज्ञान प्राधिकरण,
नागपूर

सहपत्र :

1) मार्गदर्शक सूचना व नियमावली
2) प्रपत्र 2 ते 6

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

1) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-32.
2) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग पुणे -1.
3) मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
4) मा. संचालक NCERT ,अरविंद मार्ग, नवी दिल्ली-16
5) मा. संचालक, राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,सदाशिव पेठ, पुणे- 30,
6) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे -1
7) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -1
8) मा. सहा.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य ,राजगुरू चौक , मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32
9) मा. सहा.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, जुने सचिवालय पहिला माळा, सिव्हील लाइन्स नागपूर- 01.
10) मा. कक्ष अधिकारी, एस.डी.-1. शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय , विस्तार भवन, मुंबई-32.
11) प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,(सर्व) महाराष्ट्र राज्य.

प्रतिलिपी : प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

1) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.
2) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना) शिक्षण विभाग (सर्व) महाराष्ट्र राज्य यांनी
(i) केंद्र संचालक, विज्ञान मंच केंद्र ii) विज्ञान छंद मंडळ iii) जिल्हा विज्ञान शिक्षक संघटना iv) जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी v) राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद vi) मराठी विज्ञान परिषद vii) प्रयोगशाळा सहायक/परिचर संघटना यांना त्वरित कळवावे. यास्तव प्रत अग्रेषित.
3) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळ, द्वारा श्री. दिनेश टी.पवार 'मानमित',अबोली कॉलनी ,सुयोग मंगल कार्यालयाजवळ ,मालेगाव कॅम्प,ता. मालेगाव (नाशिक) ४२३१०५
४) मा.जिल्हा/तालुका विज्ञान समन्वयक/सह समन्वयक/उप समन्वयक (सर्व) महाराष्ट्र राज्य.

प्रदर्शनीय वस्तूंचे मूल्यमापनाचे बाबतीत परीक्षकांकरिता आवश्यक सूचना

प्रदर्शनीय वस्तूंचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ आणि निःसंदिग्ध होण्याकरिता परीक्षकांच्या कामात कोणतीही ढवळाढवळ न करता विषय- उपविषय व मूल्यांकनाचे निकषाप्रमाणे गुणानुक्रमे विद्यार्थ्यांची निवड करून निरपेक्ष आणि न्यायोचित असे मूल्यमापन परीक्षकाने करणे आवश्यक आहे.**परीक्षक हे उप विषयाचे तज्ञ असावेत.**
मूल्यांकनाचे बाबतीत एकसूत्रता आणण्यासाठी एन.सी.आर.टी., नवी दिल्ली यांनी पाठविलेल्या मार्गदर्शनानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांनी मूल्यांकन करावे. राज्यस्तरीय प्रदर्शनातून राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनाकरिता प्रदर्शनीय वस्तूंची निवड करताना प्रत्येक उप- विषयावर आधारित तीन उत्कृष्ट प्रदर्शनीय वस्तूंना प्राधान्य देण्यात येईल.

प्रदर्शनीय वस्तूंचे दोन गटात विभाजन करावे.

अ) उच्च प्राथमिक स्तरापर्यंतचे विद्यार्थी : (इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंत) (सर्व शासन मान्यता प्राप्त शाळा)

ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक गट : इयत्ता 9 वी ते 12 वी (सर्व शासन मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा)

परीक्षकांनी उपविषयनिहाय प्रदर्शनीय वस्तूंचे मूल्यमापन करताना पुढील गुणदान तक्ता उपयोगात आणावा .

मूल्यमापनाचे निकष/ गुणदान तक्ता		
अ.क्र.	**मूल्यमापन निकष**	**गुण**
1.	सहभागी विद्यार्थ्यांचे सृजनशीलता व कल्पनाशक्तीचा सहभाग - (Involvement of children's own creativity and imagination)	20
2.	प्रदर्शनीय वस्तूंची मौलिकता व वैज्ञानिक आणि गणितीय नाविन्यता(Originality and scientific and Mathematical Innovations in the exhibit/model)	15
3.	वैज्ञानिक विचार तत्व, उपागम (प्रणाली) (Scientific thought/principle/approach)	15
4.	तांत्रिक, कौशल्य, कारागिरी, शिल्पकौशल्य- (Technical skill , workmanship and craftsmanship)	15
5.	समाजासाठी उपयोगीता, मापनीयता (Utility for Society and Scalability)	15
6.	अल्प खर्चिक, हस्तवाह्यता, टिकाऊपण Economic (low cost), portability, durability etc.	10
7.	सादरीकरणाचे पैलू जसे प्रयोग- दिग्दर्शन, स्पष्टीकरण आणि प्रदर्शन- (Presentation - aspects like demonstration, explanation and display)	10

1) **विद्यार्थ्यांच्या सृजन शीलता व कल्पनाशक्तीचा सहभाग**: प्रदर्शनीय वस्तूंचे मूल्यांकन करताना पुढील बाबींचा विचार करून त्यात सृजनशीलता व कल्पनाशक्तीच्या सहभागाबाबतचे वैशिष्ट्य आहे काय ? हे पहावे

अ) प्रतिकृतीची /प्रदर्शनीय वस्तूंची उभारणी करताना उपयोगात आणलेली कल्पना

ब) अडचणींचे निवारण करण्यासाठी वापरलेली पद्धत

क) पृथक्करण

ड) नवीन उपकरणांचा आराखडा व रचना.

विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीयदृष्ट्या सृजनशीलता येण्यासाठी वरील मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत. अर्थात वरील सर्व मुद्द्यांचा विचार प्रत्येक प्रदर्शनीय वस्तूंबाबत करता येईल असे नाही.उदाहरणार्थ बऱ्याच विद्यार्थ्यांनी एका संकल्पनेचा उपयोग करून त्यावर आधारित वस्तू तयार केली असेल. परंतु प्रत्येक विद्यार्थ्यांची अडचण निवारण्याचा मार्ग व पद्धत वेगवेगळी असू शकेल.**अर्थात अंतिम निर्णय हा परीक्षकांचा असेल.**

2) **प्रदर्शनीय वस्तूंची मौलिकता व नाविन्यता**: विद्यार्थ्यांनी निवडलेली संकल्पना स्पष्ट व निःसंदिग्ध मांडलेली आहे काय ? किंवा त्यावर शास्त्रीय विचार झालेला आहे काय ? तयार केलेली वस्तू पारंपारिक आहे काय? किंवा त्यात सुधारणा घडवून आणली आहे काय?तयार केलेली वस्तू संपूर्णपणे नवीन आहे काय? या गोष्टीचा मूल्यमापन करताना विचार होणे आवश्यक आहे.

3) **वैज्ञानिक विचार तत्व उपागम:** प्रदर्शनीय वस्तू तयार करताना उपयोगात आणलेल्या वैज्ञानिक विचार, तत्व व वैज्ञानिक उपागम यांचा विचार होणे आवश्यक आहे.

4) **तांत्रिक कौशल्य कारागिरी शिल्प कौशल्य :** प्रदर्शनीय वस्तू तयार करताना उपयोगात आणलेली निरनिराळे तांत्रिक कौशल्य, कारागिरी व शिल्प कौशल्य यांचा विचार करणे आवश्यक आहे.

5) **उपयोगिता आणि विद्यार्थी व सामान्य व्यक्ती यांचे करिता शैक्षणिक मूल्य:**

प्रदर्शनीय वस्तूंचे व्यवहारात उपयोग करता येते किंवा कसे ? त्याला शैक्षणिक मूल्य आहे काय ? याचा विचार होणे आवश्यक आहे.

6)**अल्प खर्चिक,हस्तवाद्यता,टिकाऊपणा :** प्रदर्शनीय वस्तू विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली असावी. ती अल्पखर्चीक असावी. प्रदर्शनीय वस्तूंची मांडणी सुटसुटीत व टापटीप असावी. ते टिकाऊ स्वरूपाची असावी. इत्यादी बाबींकडे प्राधान्याने लक्ष द्यावे.

7) **सादरीकरणाचे पैलू-जसे प्रयोग, दिग्दर्शन, स्पष्टीकरण आणि प्रदर्शन** : प्रदर्शनीय वस्तू बनविण्यामागे असलेले तत्व, सुबक वस्तू तयार करण्यामागे असलेली कल्पकता व अभिनव कल्पना याच प्राधान्य देण्यात यावे. तसेच प्रदर्शनीय वस्तूंची माहिती, प्रयोगदिग्दर्शन व स्पष्टीकरण या बाबींकडे लक्ष केंद्रित करावे .

विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतांना पुढील मुद्द्यांवर भर द्यावा :

विद्यार्थी वस्तूंचे विवेचन स्पष्टपणे आणि न अडखळता करतो काय? सर्वसाधारण माणसाला त्याने दिलेले स्पष्टीकरण समजू शकेल काय? विचारलेल्या प्रश्नांचे तो समर्पक उत्तर देतो काय? पाठांतर केलेले स्पष्टीकरण आहे काय? जर पाठांतर केलेले असल्याचे आढळल्यास त्यास कमी दर्जाचे समजून मुल्यांकनही अर्थात त्याप्रमाणात कमी राहील याचीही परीक्षकांनी नोंद घ्यावी .

विज्ञान प्रदर्शनीआयोजनाबाबतची नियमावली

जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन 21 नोव्हेंबर 2026 पूर्वी आयोजित करावे.

नियोजना करिता पुढील नियमावलीचा अवलंब करावा.

1) प्रदर्शनीय वस्तूची i) उच्च प्राथमिक स्तरापर्यंतचे इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंतचे विद्यार्थी आणि ii) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर इयत्ता 9 वी ते 12 वी पर्यंतचे विद्यार्थी अशा दोन गटात विभागणी करावी .

2) वरील दोन्ही विभागाचे प्रदर्शन एकाच वेळी वेगवेगळ्या खोल्यांमध्ये किंवा इमारतीमध्ये आयोजित करावे.

3) जिल्हा परिषद व तेथील पदाधिकाऱ्यांचे आणि स्थानिक स्तरावर उच्च प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळातील शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थाप्रमुख, विज्ञान संघटनेचे प्रतिनिधी व विज्ञान विषयात आवड असणाऱ्या समाजातील नागरिकांचे सहाय्य घेऊन प्रदर्शन आयोजनाबाबतचा तपशील ठरविण्याकरिता सभा आयोजित करावी.

4) **प्रदर्शनीय वस्तूंची निवड :** जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनानंतर गुणानुक्रमे निवडलेल्या विद्यार्थ्यांची यादी विना विलंब या कार्यालयात सादर करावी.

प्रत्येक जिल्ह्यातून

आदिवासी भाग असलेल्या जिल्हयांकरिता

उच्च प्राथमिक स्तरापर्यंतच्या गटातून (इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंत)	तीन (3)
दिव्यांग गटातून	एक (01) व
आदिवासी गटातून	एक (01)
	असे एकूण (05)
माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून (इयत्ता 9 वी ते 12 वी)	तीन (3)
दिव्यांग	एक (01) व
आदिवासी गटातून	एक (01)
	असे एकूण पाच (05)

असे दोन्ही गटातून एकूण दहा (10) प्रदर्शनीय वस्तू आणि

बिगर आदिवासी जिल्हयांकरिता

1.3	उच्च प्राथमिक स्तरापर्यंतच्या गटातून (इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंत)	तीन (3)
	दिव्यांग गटातून	एक (01) व
		असे एकूण (04)
1.4	माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून (इयत्ता 9 वी ते 12 वी)	तीन (3)
	दिव्यांग	एक (01) व
		असे एकूण पाच (04)

असे दोन्ही गटातून एकूण दहा (08) प्रदर्शनीय वस्तू

प्रदर्शनीय वस्तूंची मूल्यमापनाच्या निकषानुसार ५४ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी करीता निवड करावी.

दिव्यांग विद्यार्थ्याजवळ **सक्षम अधिकाऱ्यांचे अपंगत्वाबाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

प्राथमिक शिक्षक / माध्यमिक शिक्षक यांच्या शैक्षणिक साहित्य प्रदर्शन व स्पर्धेतून प्रथम क्रमांक येणाऱ्या प्रत्येकी फक्त **एका शिक्षकांची** निवड करावी. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक/ परिचराच्या प्रायोगिक साधनाच्या प्रदर्शन व स्पर्धेमधून फक्त **एकाच प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर** यांची निवड करावी.

निवड प्राप्त विद्यार्थी /शिक्षकांची / प्रयोगशाळा सहाय्यक/ परिचर यांची नावे जिल्हा विज्ञान प्रदर्शन आटोपल्यानंतर तात्काळ वर निर्देशित कालावधीत या कार्यालयास निर्धारित प्रपत्रात सादर करावी. ज्या विद्यार्थी/ शिक्षकांची निवड जिल्हा स्तरावर करण्यात आलेली आहे; त्यांनाच राज्यस्तरीय प्रदर्शनाकरिता पाठवावे. यात कोणताही बदल करू नये; असा बदल आढळल्यास नवीन विद्यार्थी/ शिक्षकास राज्य विज्ञान प्रदर्शनात कोणत्याही परिस्थितीत सहभाग घेता येणार नाही,याची नोंद घ्यावी.

(डॉ. राजकुमार अवसरे)
संचालक
राज्य विज्ञान शिक्षण संस्था
तथा
प्रादेशिक विज्ञान प्राधिकरण,

नागपूर

Filename:	54_RSBVP_CIRCULAR_2026_27
Directory:	C:\Users\HP\Documents
Template:	C:\Users\HP\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm
Title:	
Subject:	
Author:	HP
Keywords:	
Comments:	
Creation Date:	9/4/2026 2:02:00 PM
Change Number:	11
Last Saved On:	9/7/2026 2:47:00 PM
Last Saved By:	HP
Total Editing Time:	121 Minutes
Last Printed On:	9/7/2026 2:48:00 PM
As of Last Complete Printing	
Number of Pages:	10
Number of Words:	3,354 (approx.)
Number of Characters:	19,120 (approx.)

STATE LEVEL BAL VAIDNYANIK PRADARSHANI 2026-27

SELECTION LIST
FOR STATE LEVEL

*

NOTE: Fill all the IN ENGLISH ONLY

PRIMARY STUDENT CATEGORY

SR. NO.	NAME OF STUDENT	GENDER	UDISE NO.	SCHOOL NAME AND U-DISE NO.	SCHOOL ADDRESS	DIST RICT	SUB TOPIC OF EXHIBIT	EXHIBIT TITLE	GUIDE TEACHER NAME	GENDER	MOBILE NO.	E-MAIL
1												
2												
3												

TRIBAL आदिवासी गट (IF APPLICABLE OTHERWISE FILL NA जर असेल तर अन्यथा NA लिहावे)

1												

DIVYANG दिव्यांग (IF APPLICABLE OTHERWISE FILL NA जर असेल तर अन्यथा NA लिहावे)

1												

HIGH SCHOOL STUDENT CATEGORY

SR. NO.	NAME OF STUDENT	GENDER	UDISE NO.	SCHOOL NAME AND U-DISE NO.	SCHOOL ADDRESS	DISTRICT	SUB TOPIC OF EXHIBIT	EXHIBIT TITLE	GUIDE TEACHER NAME	GENDER	MOBILE NO.	E-MAIL
1												
2												
3												

TRIBAL आदिवासी गट (IF APPLICABLE OTHERWISE FILL NA जर असेल तर अन्यथा NA लिहावे)

1												

DIVYANG दिव्यांग (IF APPLICABLE OTHERWISE FILL NA जर असेल तर अन्यथा NA लिहावे)

1												

PRIMARY TEACHER CATEGORY

SR. NO.	NAME OF TEACHER	GENDER	UDISE NO.	SCHOOL NAME AND U-DISE NO.	SCHOOL ADDRESS	DISTRICT	TITLE OF TEACHING AIDS	MOBILE NO.	E-MAIL
1									

HIGH-SCHOOL TEACHER CATEGORY

SR. NO.	NAME OF TEACHER	GENDER	UDISE NO.	SCHOOL NAME AND U-DISE NO.	SCHOOL ADDRESS	DISTRICT	TITLE OF TEACHING AIDS	MOBILE NO.	E-MAIL
1									

LAB ASSISTANT / ATTENDANT

SR. NO.	NAME OF TEACHER	GENDER	UDISE NO.	SCHOOL NAME AND U-DISE NO.	SCHOOL ADDRESS	DISTRICT	EXHIBIT TITLE	MOBILE NO.	E-MAIL
1									

Filename:	New Microsoft Office Word Document (6)
Directory:	C:\Users\HP\Documents
Template:	C:\Users\HP\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm
Title:	
Subject:	
Author:	HP
Keywords:	
Comments:	
Creation Date:	9/8/2026 1:20:00 PM
Change Number:	1
Last Saved On:	
Last Saved By:	
Total Editing Time:	8 Minutes
Last Printed On:	9/8/2026 1:30:00 PM

As of Last Complete Printing

Number of Pages:	3
Number of Words:	287 (approx.)
Number of Characters:	1,638 (approx.)

जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन -२०२६-२०२७

प्रपत्र – दोन

परीक्षकांच्या नावाची यादी -उप-विषय-अनुसार

आयोजन स्थळ :_____

मुख्य विषय : " शाश्वत आणि विकासित भारतासाठी विज्ञान, तंत्रज्ञान,आणि नावोन्मेष "

उपविषय: १] उत्तम जीवनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता(AI)
२] हरित उर्जा आणि पर्यावरण संवर्धन
३] गणितीय प्रतिकृतीकारण आणि संगणकीय विचारसरणी
४] आरोग्य स्वच्छता आणि स्वच्छताविषयक सुविधा
५] देशी/स्थानिक कृषी पद्धती
६] ग्रामीण परिवर्तनासाठी विज्ञान
७] आपत्ती व्यवस्थापन

अनुक्रमांक	परीक्षकाचे नाव	पदनाम	कार्यालयाचा पत्ता, दूरध्वनी, फॅक्स व ई-मेल	निवास पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी
१				
२				
३				
४				
५				
६				
७				
८				
९				
१०				
११				
१२				
१३				

जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन -२०२६-२७

प्रपत्र - तीन

भाग घेणाऱ्या शाळांबाबातची माहिती

जिल्हा : _____

प्रदर्शनाचा दिनांक : _____

प्रदर्शनाचे स्थळ : _____

शाळेचा प्रकार	**आदिवासी /ग्रामीण/शहरी**	**शाळांची संख्या**	**प्रदर्शनीय वस्तू/ मॉडेलची संख्या**	**शाळेतील भाग घेणारे सहभागी**						
				शिक्षक			**विद्यार्थी**			
				पुरुष	**स्त्री**	**एकूण**	**पुरुष**	**स्त्री**	**एकूण**	**अ.जा./अ.ज.जा.**
शासकीय	आदिवासी									
	ग्रामीण									
	शहरी									
स्थनिक संस्था	आदिवासी									
	ग्रामीण									
	शहरी									
खाजगी विनानुदानित	आदिवासी									
	ग्रामीण									
	शहरी									
एकूण										

शा- शासकीय: कोणत्याही राज्य शासनाचा व केंद्र सरकार तसेच सार्वजनिक क्षेत्राचा उपक्रम व सरकारद्वारे पूर्णतः अर्थसहाय्यता प्राप्त स्वायत्त संस्थाद्वारे शासकीय शाळा.

स्था सं – स्थानिक संस्था : पंचायत राज व स्थानिक निकाय संस्था जशा जिल्हा परिषदा, नगरपालिका, नगरपालिका समिती वा कॅन्टोनमेन्ट बोर्ड द्वारा संचालित शासकीय शाळा .

खा.अ,- खाजगी अनुदानित : कोणत्याही खाजगी संस्था व कोणतीही व्यक्ती विशेषद्वारे संचालित शाळा जी शासकीय वा स्थानिक निकालापासून अर्थसहाय्यता घेते.

खाविअ.- खाजगी विनाअनुदानित: कोणत्याही खाजगी संस्था व कोणतीही व्यक्ती विशेष द्वारे संचालित शाळा जी शासकीय वा स्थानिक निकायापासून पासून कोणतीही अर्थसहाय्यता घेत नाही.

स्वाक्षरी

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक

जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन २०२६-२०२७

प्रपत्र - चार

प्रदर्शनीय वस्तूंचा प्रकार व त्यांची संख्या याबाबतची माहिती

मुख्य विषय : "शाश्वत आणि विकासित भारतासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावोन्मेष "

जिल्हा : _____

प्रदर्शनाचा दिनांक : _____

प्रदर्शनाचे स्थळ : _____

प्रदर्शनीय वस्तूंचा प्रकार व त्यांची संख्या					प्रदर्शनीय वस्तूंची एकूण संख्या
उपविषय	नाविन्यपूर्ण/तात्कालिक उपकरण /कार्यरत प्रतिकृती	स्थिर प्रतिकृती	अभ्यास/सर्वेक्षण अहवाल	इतर कोणतेही (उल्लेख करावा)	(उल्लेख)
उत्तम जीवनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)					
हरित उर्जा आणि पर्यावरण संवर्धन					
गणितीय प्रतीकृतीकरण आणि संगणकीय विचारसरणी					
आरोग्य स्वच्छता आणि स्वच्छता विषयक सुविधा					
देशी /स्थानिक कृषीपद्धती					
ग्रामीण परिवर्तानास्ठी विज्ञान					
आपत्ती व्यवस्थापन					
एकूण बेरीज					

स्वाक्षरी

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक

जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन -२०२६-२७

प्रपत्र – सहा

मुख्य विषय : " शाश्वत आणि विकासित भारतासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावोन्मेष "

सहभागी प्रदर्शनीय वस्तूंचे मूल्यमापन/गुणदान तक्ता (उपविषय निहाय)

अ.क्र.	कोड नंबर	उपविषय	सृजनशीलता व कल्पना शक्तीचा सहभाग	मौलिकता व वैज्ञानिक आणि गणितीय नाविन्यता	वैज्ञानिक विचार, तत्व उपगम प्रणाली	तांत्रिक कौशल्य, कारागिरी, शिल्प कौशल्य	समाजासाठी उपयोगिता, मापनियता	अल्पखर्चिक,हस्तवाह्यता , टिकाऊपणा	सदरीकारणाचे पैलू (प्रयोग दिग्दर्शन,स्पष्टीकरण , प्रदर्शन)	एकूण गुण
			20	15	15	15	15	10	10	100
1										
2										
3										
4										
5										
6										
7										
8										
9										
10										

टिप: १] ग्रामीण तथा मागास क्षेत्रातील प्रदर्शित वस्तूंना ५ टक्के अतिरिक्त भारांश देण्यात यावा.

२] अर्ध शहरी क्षेत्रातील प्रदर्शित वस्तूंना 3 टक्के अतिरिक्त भारांश देण्यात यावा.

राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान
और प्रशिक्षण परिषद्

विद्यया ऽमृतमश्नुते
एन सी ई आर टी
NCERT

NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL
RESEARCH AND TRAINING

F.No. 12-4/DESM/ACM/2026-27/
DEPARTMENT OF EDUCATION IN SCIENCE AND MATHEMATICS

Date: 28 August, 2026

This is for information of all concerned that the Theme, Sub-theme and Topic for One Day Seminar for Rajya Stariya Bal Vaigyanik Pradarshani (RSBVP) 2026-27 and Rashtriya Bal Vaigyanik Pradarshani (RBVP) 2027 are as follows: -

Theme: Science, Technology, and Innovation for a Sustainable and Viksit Bharat

Sub-themes:

1. Artificial Intelligence (AI) for Better Life
2. Green Energy & Environmental Conservation
3. Mathematical Modelling and Computational Thinking
4. Health, Hygiene, and Sanitation
5. Indigenous Agricultural Practices
6. Science for Rural Transformation
7. Disaster Management

(Note: Sub-themes mentioned above are suggestive in nature. Students may develop innovative models on any other sub-theme pertaining to the main Theme i.e., Science and Technology for Society)

Topics finalized for the one-day seminar are:

1. STEM for Climate Action
2. Non-Communicable Diseases: Causes and Preventive Measures

28/08/2026
(Dr. Niroj Kumar Sahu)
Professor & Coordinator, RSBVP

28/08/2026.
(Dr. Sunita Farkya)
Professor and Head, DESM

श्री अरविन्द मार्ग, नई दिल्ली-110016
दूरभाष : 011-26562188
वेबसाइट : https://ncert.nic.in

SRI AUROBINDO MARG, NEW DELHI-110016
PHONE : 011-26562188
Website : https://ncert.nic.in